रे. मु. नं. २१/२०१३

**ज्युड रॉड्रिक्स**
**वि.**
**मार्तोंड रुझार**

निशाणी नं. १ वरील आदेश

प्रस्तुत दावा जुना आहे. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा पुढील योग्य ती पुर्तता करणेकामी मागील अनेक तारखांपासून प्रलंबित असल्याचे दिसते. वादी व तर्फे वकीलांना वारंवार पुकारा केला. वादी व तर्फे वकील गैरहजर. गैरहजेरीच्या संयुक्तीक कारणासह कोणताही अर्ज नाही. रोजनाम्याचे अवलोकन केले असता मागील अनेक तारखांना वादी व तर्फे वकील सातत्याने गैरहजर आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये कसलीही तजविज नाही. वादी व तर्फे वकीलांची सातत्याने गैरहजर राहण्याच्या कृतीवरुन वादीस प्रस्तुत दावा पुढे चालविण्यात कोणतेही स्वारस्य नसल्याचे दिसते.

प्रस्तुत दाव्यामध्ये वादीच्या वादीच्या अर्जामध्ये कोर्ट कमिशन ओदश पारीत झाला आहे. तथापि, सदर आदेशानंतर वादीने पुन्हा कोर्ट कमिशन नेमण्याकरीता अर्ज दाखल केल्याचे दिसते. निशाणी ६२ कडील आदेशामध्ये वादीने स्वत: नमुद केलेल्या दावा मिळकतीबाबत कोर्ट कमिशन नेमण्याबाबतचा आदेश दिनांक १६.०८.२०१७ रोजी पारीत करणेत आला होता. तथापि, वादीने निशाणी ७० कडे व निशाणी ६२ मधील अर्जामध्ये दावा मिळकतीचे वर्णन चुकीचे असल्याचे नमुद करुन आदेशामध्ये दुरुस्ती करणेचा अर्ज केला. तद्नंतर वादीस पुढील योग्य स्टेप्स घेण्याचे आदेश पारीत करुनही अद्याप पर्यंत वादीने कोणतीही योग्यती पुर्तता

केलेली नाही. दावा विना प्रगती प्रलंबित आहे. दावा अंशत: सुनावणीकरीता आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये दिनांक ४.११.२०१५ नंतर वादीचा उलटतपास संपल्यानंतर आजतागायत पुढील साक्षीदार देण्यात आलेले नाहीत.

दावा अतिक्रमण दुर करुन मिळणेचा आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये वादी सातत्याने गैरहजर राहिल्यावरुन व वादीतर्फे पुढील योग्य ती पुर्तता न केल्याच्या कारणावरुन वादीस प्रस्तुत दावा चालविणेचा नाही असे दिसते. दावा २०१३ मधील आहे. मे. मुंबई उच्च न्यायालयाचे आदेशान्वये जुने दावे तातडीने व अग्र क्रमाने निकाली करण्याचे आदेश आहेत. प्रस्तुत दाव्यामध्ये वादीतर्फे स्टेप्स घेतलेल्या नाहीत. वादीच्या गैरहजेरीच्या कारणावरुन प्रस्तुत दावा खारीज करणेस योग्य आहे.

प्रस्तुत दावा मागील अनेक तारखांपासून निशाणी ७३ कडील युक्तीवादाकरता प्रलंबित आहे. वादी सातत्याने गैरहजर राहील्याने आजतागायत युक्तीवाद नसल्याचे दिसते. प्रस्तुत दाव्याकामी यापूर्वी दावा मिळकतीची मोजणीकरीता वादीने दिलेल्या अर्जान्वये कोर्ट कमिशन आदेश पारीत झाला आहे.

वरील सर्व कारणमिमांसा पाहता वादीच्या सातत्तयाने गैरहजेरीच्या कारणाने प्रस्तुत दावा पुढील तारीख २८.११.२०१९ रोजी काढून टाकणेकरीता ठेवण्यात येत आहे. आदेशाची नोंद वादी व तर्फे वकीलांनी घेणेची आहे.

मुरुड (एम. ए. के. शेख)
दिनांक ०७/११/२०१९ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मुरुड